# श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना लि., मंगळवेढा, जि.सोलापूर.

फोन नं.: ८३०८८०८६३३ Website : www.damajisugar.com E-mail : santdamajissk@gmail.com

जा.क्र. संत दामाजी/प्रशासन/वार्षिक सभा/ /२०२३-२४ दि.१०/०९/२०२३

## - अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस -

### (फक्त सभासदांकरीता)

प्रति,

मा.श्री./.सौ. ------------------------------------------------------------------------

रा. ------------------------------------------ ता.मंगळवेढा, जि.सोलापूर.

सर्व सभासद बंधू-भगिनींना कळविण्यात येते की, श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना लि., मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर या संस्थेची सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाची अधिमंडळाची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२४/०९/२०२३ रोजी दुपारी १.०० वा. कारखाना कार्यस्थळावर कारखान्याचे चेअरमन, मा.श्री.शिवानंद यशवंत पाटील यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावंर विचारविनीयम करणेसाठी आयोजित करणेत आलेली आहे. तरी सदरहु सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

## - सभेपुढील विषय -

विषय क्र.१ : संस्थेच्या पोटनियम क्र.१७ मधील तरतुदीनुसार सभेला अनुपस्थित सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणेबाबत निर्णय घेणे.

विषय क्र.२ : दि.२९/०९/२०२२ रोजी झालेल्या मा.अधिमंडळाच्या ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

विषय क्र.३ : सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा संस्थेच्या कामकाजाविषयी मा.संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल स्विकारणे व दि.१/४/२०२२ ते दि.३१/३/२०२३ या कालावधीची ताळेबंद व नफा-तोटा पत्रके परिशिष्ठासह स्विकारणे व त्यास मान्यता देणे.

विषय क्र.४ : वैधानिक लेखापरिक्षक जे.के. चौहान ॲन्ड कंपनी चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांचेकडून आलेला सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा लेखा परिखण अहवाल वाचून नोंद घेणे तसेच मागील आर्थिक वर्ष २०२१-२२ चा मा.संचालक मंडळाने सादर केलेला दोष दुरूस्ती अहवाल स्विकारणे व त्यास मान्यता देणे.

विषय क्र.५ : सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त जमाखर्चास मंजूरी देणे.

विषय क्र.६ : सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मा.संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

विषय क्र.७ : सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता शासनमान्य लेखापरिक्षकांच्या पॅनलवरील वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना निश्चित करणे.

विषय क्र.८ : सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता जी.एस.टी.सल्लागार, अंतर्गत लेखापरिक्षक, टॅक्स ऑडीटर, आयकर सल्लागार, विक्रीकर सल्लागार, ई.टी.पी.प्लॅन्ट सल्लागार तसेच कायदे सल्लागार व आवश्यकतेनुसार इतर सल्लागारांच्या नेमणुका करणे व त्यांचा मेहनताना निश्चित करणे.

विषय क्र.९ : मा.अध्यक्षसाहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून

रमेश अंबादास जायभाय
प्र.कार्यकारी संचालक

## - विशेष सुचना -

१) कोरमअभावी सभा तहकुब केली गेल्यास याच विषयपत्रकेत नमूद केलेल्या विषयांवर विचार विनीमय करणेसाठी दोन तासानंर सभा घेण्यात येईल. या सभेस कोरमची आवश्यकता भासणार नाही.

२) सभासदांना कामकाजाविषयी धोरणात्मक सुचना अगर प्रश्न विचारार्थ ठेवावयाचे असतील त्यांनी बुधवार दि.१९/०९/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत कारखाना प्रशासन ऑफिसकडे पोहोचतील अशा रितीने प्रत्यक्ष/ई-मेलवर पाठवावेत.

३) संस्था सभासदांनी प्रतिनिधीचा ठराव दि.१९/०९/२०२३ पूर्वी पाठविण्याची व्यवस्था करावी.

४) कारखान्याचे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक कारखाना बेवसाईट www.damajisugar.com वर पहावयास उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.